
ISBN : 978-81-939613-2-2



# अण्णा भाऊ साठे : समतावादी साहित्यीक

संपादक

डॉ. दिपक सुर्यवंशी

डॉ. सदाशिव भुयारे

अनुप्रिता मोरे

ISBN : 978-81-939613-2-2


| | | |
|---|---|---|
| ४१. | **अण्णा भाऊ : मानवतावादी शैलीदार लेखक**<br>**प्रा.डॉ.भास्कर वि.नरवाडे** | 237 |
| ४२. | अण्णा भाऊ साठे : उपेक्षित वंचितांचा हुंकार<br>प्रा. डॉ.संजय कसाब | 242 |
| ४३. | विश्वसाहित्यिक अण्णा भाऊ साठे<br>डॉ.संगीता पैकेकरी | 247 |
| ४४. | अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार<br>प्रा.सदाशिव राजाराम भुयारे | 250 |
| ४५. | **अण्णा भाऊ साठे : एक स्वंतत्र ज्ञानशाखा**<br>प्रा . प्रदीप ववनराव मोहिते | 255 |
| ४६. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील परिवर्तनवाद<br>डॉ. संजय माधवराव सांभाळकर | 259 |
| ४७. | आण्णाभाऊ साठे : जीवन,साहित्य आणि कार्य<br>प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड | 264 |
| ४८. | अण्णाभाऊ साठेंचा पोवाडा : एक वास्तवदर्शी शाहिरीचे स्वरुप<br>प्रा.डॉ.शोभा रोकडे | 267 |
| ४९. | अण्णा भाऊ साठे के साहित्य में आंबेडकरवाद<br>प्रा.डॉ.प्रकाश सदाशिव सूर्यवंशी | 273 |

ISBN : 978-81-939613-2-2

# अण्णा भाऊ : मानवतावादी शैलीदार लेखक

**प्रा.डॉ.भास्कर वि.नरवाडे**

**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर**

---

माणसाचा माणूस म्हणून सन्मान करणे हा मानवतावादाचा मुलभूत गाभा होय. तर माणसाला सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त करणे हे अण्णाभाऊचे ध्येय व ध्यास होता. समाजातल्या दीन-दुबळ्या, वंचित, बहिष्कृत माणसाला आदराने वागवणे आणि त्याला मानवी हक्कासाठी लढायला उभे करणे हे अण्णा भाऊच्या साहित्याचे कार्य आहे. त्यांचे समग्र साहित्य वर्गवाद आणि वर्णवर्चस्ववाद विरोधी असून मानवमुक्तीचा विचार सांगणारे आहे. पिढ्यानपिढ्या माणूसपण हिरावलेल्या गावकुसाबाहेरच्या माणसांना माणूस म्हणून जगण्याची हिंमत व शिकवण अण्णा भाऊचे साहित्य देते. अण्णा भाऊनी बुद्ध, फुले, मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार आपल्या साहित्यातून मांडून परिवर्तनवादी चळवळ गतिमान केली आहे.

अण्णा भाऊच्या साहित्याचा मुख्य बाणा व उद्देश हा शोषित वंचिताना माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचे हक्क प्राप्त करून देणे हाच आहे. वेदना, विद्रोह ही अण्णा भाऊच्या साहित्याची वैशिष्टये असली तरी त्यांचा विद्रोह हा सकारात्मक व आशावादी गोष्टीसाठी झालेला आहे. हे लक्षात घ्यावे लागते. पारंपरिक विषमतावादी धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक व्यवस्थेला अण्णा भाऊच्या साहित्याने सुरुंग लावला आहे.

गावकुसाबाहेरील निवडुंगाच्या बनात राहणाऱ्या वंचित व दुर्बलांना हजारो वर्षे अपमानित व अन्यायग्रस्त जीवन जगायला भाग पाडणाऱ्या रुढी-प्रथा व परंपरांना अण्णा भाऊनी उदध्वस्त केले. माणसाची प्रतिष्ठा व त्याचे स्वातंत्र्य हयाला केंद्रस्थानी ठेवून माणूस हेच एक मूल्य आहे. अशी भूमिका अण्णा भाऊची होती. मानवतावादाच्या संदर्भात महेंद्र भवरे म्हणतात, "मानवी नात्याचे, आणि माणसा-माणसातील संबंधाचे दिग्दर्शन मानवतावादात केलेले असते. व्यक्ती म्हणून मानवाचे मूल्य, मानवाचे मुलभूत अधिकार व्यक्तिस्वातंत्र आणि व्यक्तिविकास या हक्काचे समर्थन, समानता, न्याय, एकमेकाशी सृह्दय वागवणूक हे माणसा-माणसांतील निकष मानले गेले आहेत." १ मानवतावादात सांगितलेल्या माणसांच्या मुलभूत अधिकारापासून व हक्कांपासून उपेक्षितांना विषमतावादी व्यवस्थेने हजारो वर्षे कोसो दूर ठेवले होते बहुसंख्य अस्पृश्य समाजाला या व्यवस्थेने माणूसपण नाकारले होते. गाव कुसाबाहेरच्या अस्पृश्यांनी माणसासारखी माणसे असूनही कित्येक पिढया पशुतूल्य जीवन मुकपणे व्यतित केले.

हजारो वर्षाच्या या अमानवी जोखडातून अस्पृश्यांना युगपुरुष डॉबाबासाहेब आंबेडकरांनी मुक्त केले. व संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मानवतावादी उदात मूल्यांची सनद त्यांना बहाल केली. अण्णा भाऊचा जीवन व लेखन प्रवास या मूल्यांच्या स्विकारातून मानवतावादाकडे झाला आहे. समाज परिवर्तनाच्या लढयात बाबासाहेबांना गुरु मानून अण्णा भाऊनी त्यांचीच प्रेरणा घेतली आहे. बाबासाहेबांचे विचार, शिकवन व तत्वज्ञान गुरुपदेश मानून शतकोवर्षाच्या गुलामगिरीचे जोखड फेकून देऊन जग बदलण्याचे आवाहन, ते उपेक्षितांना करताना म्हणतात,

'जग बदल घालूनी घाव सांगून गेले मला भीमराव' अशी डॉ.बाबासाहेबांच्या विचारांवर अण्णा भाऊची निष्ठा होती. म्हणूनच त्यांची मास्टरपीस, असणारी 'फकिरा' ही कादंबरी त्यांनी बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली आहे. फकिराच्या माध्यमातून अण्णा भाऊ बाबासाहेबांचे विचार मांडताना म्हणतात, "एक राजा हतं झाला. त्येचं नाव मी इसरलो. त्यो राजा म्हणत व्हता. शेळी म्हूनशान शंभर वरिस जगण्यापरीस वाघ हुनशान एक दिस जगावं."२ फकिरा हा मानवी लढयासाठी लढतो, तो गावासाठी लढतो, त्याचा लढा जसा भाकरीसाठी आहे. तसाच तो स्वाभिमानानं जगण्यासाठी सुध्दा आहे. हे आपल्या लक्षात येते.

अण्णा भाऊनी आपल्या समग्र साहित्यातून बलदंड, स्वाभिमानी व कणखर अस्पृश्यांचे विश्व रेखाटले आहे. त्यांचे साहित्य क्रांतिप्रवण असून वंचिताच्या दुःखाना वाचा फोडणारे आहे. त्यांच्या साहित्यावर मार्क्सवादी विचारसरणीची दाट छाया जाणवत असली तरी, मार्क्सवादाने भारतातील विषमताधिष्ठित चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थचे प्रश्न सुटणार नाहीत.हे अण्णाभाऊंनी ओळखल्यानंतर आंबेडकरवादी तत्वज्ञानाचे अधिष्ठान असणारे साहित्य अण्णा भाऊनी लिहिले आहे. वंचिताचे, पिडितांचे दुःख, वेदना आपल्या लेखणीदवारे चित्रित करुन या दुःखाची कारणे समाजाला समजावून सांगितली. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे, करमणुकीचे साधन नसून ते तळागाळातील शोषित, वंचित माणसांच्या उत्थापनाचेही माध्यम आहे. हे त्यांनी ओळखले होते. बरबाद्या कंजारी कथा संग्रहाच्या प्रस्तावनेत अण्णा भाऊ लिहितात, "माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरचं हे जग चालतं, त्यांची झुंज नि त्यांच यश यावर माझा विश्वास आहे."३ असे अण्णा भाऊचे मत होते. त्यामुळे त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी तीच माणसे आहेत.

प्रत्येक माणसाला विकासाची समान संधी उपलब्ध झाली पाहिजे त्याच्या विकासामध्ये जात, धर्म, वर्ण व वंश असा कोणताही भेदभाव अडथळा ठरु नये. कारण

समानता हा लोकशाहीचा मूलाधार आहे. माणूस हाच सर्व गोष्टीचा मानदंड असावा. मानवी जीवनाचा विकास हे साध्य व इतर संस्था साधने होत अशीभूमिका अण्णा भाऊ घेतात. त्यामुळे त्यांनी हाताळलेले विषय, त्यातील विचार व माणसे ही तळागाळातील होती.अण्णा भाऊचे आपल्या मातीशी, परिसराशी व आपल्या माणसांशी घट नाते आहे. हे त्यांच्या साहित्याचा पोत अभ्यासल्यानंतर लक्षात येते. या विषयी डॉ.प्रकाश खरात म्हणतात, "अण्णा भाऊनी रेखाटलेले जीवन हे अनेक जाती धर्मातील माणसांचे आहे. अस्पृश्य व स्पृश्य या श्रेष्ठ कनिष्ठ ठरविलेल्या स्त्री पुरुषांचे आहे गरीब व श्रीमंत या वर्गात जन्मल्यानंतर काय मिळते या प्रश्नाच्या उतराचे आहे."४ याप्रमाणे अण्णा भाऊनी आपल्या साहित्यात शोषितांचे, वंचिताचे सारे जगच चित्रित केले आहे. अण्णा भाऊचे साहित्य हे मानवतावादी आहे. कारण त्यांच्या समग्र साहित्यातून विशिष्ट जातीचा किंवा वर्गाचा उल्लेख होत नाही. तर समग्र मानव जातीच्या कल्याणाचा विचार व्यक्त होतो. एखाद्या व्यक्तिने वाईट कृत्य केले असले तरीही माणसातील वाईटपणा काढून त्याला जगण्याची संधी द्यावी असा मानवातावादी विचार व्यक्त होतो. फकिरा कादंबरीत फकिराच्या वडीलाचा खुनी बापू खोत जोगणी घेऊन पळत असताना ज्या हातात जोगणी आहे तो हात फकिरा तोडतो. पण वास्तवात स्वत:च्या वडिलाचा खुन खोतानी केला हे फकिराला माहीत असूनही व त्याला ठार मारता येत असूनही फकिरा असे न करता त्याला सोडून देतो. कारण अण्णा भाऊचा परिवर्तनावर विश्वास आहे.

अण्णा भाऊची जीवनावर व जगण्यावर प्रचंड निष्ठा होती. आज सर्वच क्षेत्रात काम करताना अपयश आल्यास माणूस मृत्यूला कवटाळत आहे परिणामी आत्महत्येच पीक जोरात वाढत आहे. महाराष्ट्रात दररोज सात-आठ शेतकरी आत्महत्या करुन जीवन संपवत आहेत. अस्मानी व सुल्तानी संकटात सापडलेला जगाचा पोशिंदा बळीराजा आज मृत्यूला कवटाळत आहे. पण परिस्थिती किती ही प्रतिकूल असली तरीही परिस्थितीवर मत करून जीवन जगले पाहिजे असा मानवतावादी विचार अण्णा भाऊचे अनेक नायक देतात. विष्णूपंत कुलकर्णी या कथेत दुष्काळ व साथीच्या रोगामुळे गावातील लहान मुले, वृध्द माणसे अन्न पाण्यावाचून मृत्यू पडतात एकाच खड्यात पाच-दहा प्रेताना एकत्र गाडले जाते. अशा परिस्थितीत कथेतील मुरा पंताना म्हणतो, "भाकरी – भाकरी करुन पोरांचे चरफडून मरनं अन् त्यांचा हंबरडा आता माझ्यानं ऐकवना ढेकळावाणी काळीज इरगळतयं, यावर विष्णूपंत म्हणतात, काहीही करा, पण जगा."५ हा अण्णा भाऊचा विचार त्यांची जीवनावरची निष्ठा व जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती व्यक्त करतो असेच म्हणावे लागते.

स्वातंतत्र्यानंतर आज ७३ वर्षानंतरही भारतातील स्त्रिया सुरक्षित नाहीत स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. हुंडाबळी, बलात्कार यांसारख्या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनांनी समाज हादरुन जात आहे. खैरलांजी, कोपर्डी, दिल्ली तर नुकतेच हैद्राबाद व उन्नाव येथील प्रकरणे मानवतेला कलंक आहेत. पण अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून स्त्रियांचे चारित्र्य व स्वातंत्र्य यांना खूप महत्व दिले आहे. त्यांच्या अनेक कथा कादंबऱ्यामध्ये स्त्रिया मुख्य व्यतिरेखा आहेत. त्यांचे नायक स्त्रियांचा मान-सन्मान करतात. 'खुळंवाडी' कथेतील नावगाव माहीत नसलेल्या अनाथ मंजुळेला सर्व गावच खुळवाडीची मानसकन्या मानते. तिच्याकडे वाईट नजरेने पाहणाऱ्या, तिच्या पदराला हात घालणाऱ्या पाटलाचे हात तोडून तुरुंगात जाणारा पिलाजी या कथेत येतो. तर सावळा या कथेत सावळा मांग हा स्त्रियांच्या चारित्र्यासाठी, त्यांचे संसार उभे करण्यासाठी अविरत संघर्ष करतो. हुंडयामुळे माहेरी असणाऱ्या अनेक मुलींचे संसार तो उभे करतो. प्रसंगी वाईट जावयांना तो दमही भरतो. जयसिंगपूरच्या दादा पाटलाची मुलगी काशीला १५ हजार रुपयांसाठी तिचा नवरा राजाराम पाटील नांदवत नाही. तिचा मोडलेला संसार सावळा उभा करतो. म्हणूनच या परिसरातील मुली सावळा जिथं राहतो त्या वाघदऱ्यालाच आपल माहेर मानतात. 'वारणेचा वाघ' कादंबरीचा नायक सत्तू भोसले गरोदर महारीण स्त्रिला क्षुल्लक कारणावरुन मारहाण करणाऱ्या मथाजी चौगुल्याचा खुन करून फरारी होतो. व आपल्या परिसरात स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबवतो. त्यामुळे सकाळी जात्यावर दळण-कांडन करताना त्याच्या मानलेल्या बहिणी त्याच्यासाठी ओव्यामधून उदंड आयुष्य मागताना म्हणतात,

'नसले जरी माहेर, भाऊ असावा पाठीचा गरीबाचा वाली जसा, सत्याबा कुमजेचा'

अण्णा भाऊनी उपेक्षितांचे, वंचितांचे अंतरंग जसे मांडले, तसेच विष्णूपंत कुलकर्णी, शंकर पाटील यांसारख्या वंचिताबददल कणव व ममत्व असणाऱ्या उच्चवर्णीयांचे अंतरंग प्रकट केले. हे अण्णा भाऊच्या माणसांवरील विश्वासामुळे शक्य झाले. ते शोषकांबद्दल देखील फारशी कटुता बाळगत नाहीत. कारण परिवर्तनावर त्यांचा विश्वास आहे. ते माणसावर श्रदधा ठेवणारे आणि प्रत्येकाला जीवनात स्वातंत्र्य व समता मिळावी असा आग्रह धरणारे आहेत. २ मार्च १९५८ रोजी संपन्न झालेल्या दलित साहित्याच्या उद्घाटनपर भाषणात ते म्हणतात, "मानवाला त्याच्या बाहय जीवनाच्या परिस्थितीतून वरच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न करणे, त्याला कमीपणा आणणाऱ्या वास्तव जगाच्या बंधनातून मुक्त करणे आणि तू गुलाम नाहीस, तू  वास्तव जगाचा धनी आहेस, तू जगाचा स्वतंत्र निर्माता आहेस असा साक्षात्कार करून देणे हे वाङ्.मयाचे खरे वैशिष्टये आहे." ६ यावरुन श्रेष्ठ साहित्याचा माणूस हा केंद्रबिंदू असला पाहिजे असा अण्णा

भाऊचा आग्रह होता. आणि म्हणूनच माणसाचे आणि त्याच्या श्रमाचे मूल्य कायम राखून अण्णा भाऊ लेखन करतात.

**निष्कर्ष :-**

- अण्णा भाऊचे साहित्य हे मानवतावादी साहित्य आहे. माणसाची सर्व प्रकारची शोषणमुक्ती हा त्यांचा ध्यास व ध्येय होते. कष्टकरी, वंचित, पीडितांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला.
- अण्णा भाऊचे समग्र साहित्य वर्गवाद, वर्णवर्चस्ववाद विरोधी असून मानवमुक्तीचा विचार सांगणारे परिवर्तनवादी साहित्य आहे.
- माणसाची प्रतिष्ठा व स्वातंत्र्य ह्याला केंद्रस्थानी ठेवून माणूस हेच एक मूल्य आहे. ही भूमिका अण्णा भाऊची आहे.
- अण्णा भाऊचा जीवन व लेखन प्रवास बुध्द, फुले, मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तात्त्विक स्विकारातून मानवतावादाकडे झाला आहे.

**संदर्भग्रंथ :**


१. भवरे महेंद्र: दलित कविता आणि प्रतिमा .मय गृह, मुंबई प्रथमावृत्ती २०१२ पृ.१३८

२. साठे, अण्णा भाऊ : फकिरा, सुरेश एजन्सी, पुणे चौदावी आ.१९९३ पृ.१११

३. साठे, अण्णा भाऊ: बरबाद्या कंजारी : विद्यार्थी प्रकाशन, पुणे

४. डॉ.खरात प्रकाश: दलित कथा उद्गम आणि विकाससुगावा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९९२ पृ.७२

५. साठे अण्णा भाऊ : खुळंवाडी विद्यार्थी प्रकाशन, पुणेनवीन आवृत्ती २००६ पृ.८२

६. गुरव बाबुराव : समाज विचार आणि साहित्य विवेचन लोकवाड्.मय गृह, मुंबई व्दितीयावृत्ती १९९९ पृ.३०